## प्रेसनोट

### मॅक्स् लाईफ इन्स्युरन्स कंपनीमधुन बोलत आहे असे भासवून फसवणुक करणाऱ्या दिल्लीस्थित ठगास पुणे सायबर सेल, गुन्हे शाखेकडुन दिल्लीतुन अटक.

फिर्यादी नामे शिवाजी काटे, रा. पिंपळे सौदागर यांना दि. २५/०५/२०१६ रोजी त्यांच्या मोबाईल क्रमांकावर मॅक्स् लाईफ इन्स्युरन्स कंपनीमधुन अग्रवाल बोलतोय असे सांगून फिर्यादीचे नाव, जन्मतारीख, व मॅक्स् लाईफ इन्स्युरन्स पॉलीसीचा क्रमांक सांगितला व त्याच्या पॉलीसीचा या वर्षीचा हफ्ता भरावयाचा असुन अंतिम तारीख ३०/०५/२०१६ आहे व सदर पॉलिसीचा हफ्ता लवकरात लवकर बँक ऑफ बरोडा शाखा, नजबगड येथे भरल्यास दंड होणार नाही असे सांगितले.

फिर्यादीची सर्व माहीती बरोबर सांगितल्याने फिर्यादीचा विश्वास पटल्याने त्यांनी नजबगड येथील बँक ऑफ बरोडा बँकेच्या अकाउंटमधे ९७,०००/- रु भरले त्यानंतर फिर्यादीने मॅक्स् लाईफ इन्स्युरन्स कंपनीच्या अकाउंटमधे पैसे जमा झाले आहेत का याची खात्री करण्याकरीता सदर कंपनीला फोन करुन विचारले असता त्यांच्या मॅक्स् लाईफ इन्स्युरन्स विमा पॉलिसी अकाउंटला पैसे जमा झाले नव्हते म्हणुन फिर्यादीने अग्रवाल यांना फोन करण्याचा प्रयत्न केला असता फोन बंद लागत होता त्यावेळी फिर्यादीच्या लक्षात आले की, त्यांची फसवणुक झाली आहे. म्हणुन त्यांची दि. ०९/०७/२०१६ रोजी सांगवी पोलीस स्टेशन येथे गु. रं. क्र. २२४/२०१६, भा.द.वि. कलम ४१९, ४२० व आय. टि. ॲक्ट ६६ (डी) नुसार गुन्हा दाखल केला होता.

सदर गुन्हयाचा समांतर तपास सायबर सेल, गुन्हे शाखा करत होती यातील आरोपी हे दिल्ली स्थित असल्याचे निष्पन्न झाल्याने सायबर सेलकडील पोलीस उपनिरीक्षक प्रविण स्वामी व पोलीस उपनिरीक्षक कैलास गवते व स्टाफ हे दिल्ली येथे जाउन आरोपीचा शोध घेउन आरोपी नामे अजय लक्ष्मणदास, वय- ३० वर्षे, रा. ए ३७१ जनता कॉलनी, रघुवीरनगर, दिल्ली यास ताब्यात घेतले. सदर गुन्हयात वापरलेले बँक ऑफ बरोदा, शाखा राजोरीगार्डन, दिल्ली ही या आरोपीच्या नावावर असुन त्याने सेट्रल बँक ऑफ इंडीया टिळकरोड, दिल्ली, सिंडीकेट बँक, तवेरीगार्डन, दिल्ली या बँकेत बनावट नावाने अकाउंट काढल्याने निष्पन्न झाले आहे.

त्याच्याकडुन तिन्ही बँकेचे अकाउंटचे पासबूक, २ मोबाईल हॅन्डसेट जप्त करण्यात आले आहेत व या गुन्हयातील रक्कम रु ६५,०००/- ही जप्त करण्यात आली आहे तसेच त्यांच्याकडे अधिक चौकशी केली असता आरोपीने त्याचा भाचा नामे विनोदकुमार, वय – २५ वर्षे, रा. रानविहार, दिल्ली यांनी अशाप्रकारे बऱ्याच लोकांची फसवणुंक केल्याचे निष्पन्न झाले आहे.

आरोपी विनोदकुमार यांचा शोंध सुरु असुन, आरोपी विजयदास यांस सांगवी पोलीस स्टेशन येथे वर्ग करण्यात आले आहे.

वरील कामगिरी श्री. दिपक साकोरे, पोलीस उप- आयुक्त, आर्थिक व सायबर गुन्हे यांचे मार्गदर्शनाखाली वरीष्ठ पोलीस निरीक्षक सुनिल पवार, सहा. पोलीस निरीक्षक सागर पानमंद, पोलीस उप निरीक्षक प्रविण स्वामी, पोलीस उप निरीक्षक कैलास गवते, पो.शि. अविनाश दरवडे, पो.शि. शाहारुख शेख, पो.शि. राहुल हंडाळ, पो.शि. निकीप राठोड, पो.शि. अश्वीन कुमकर, पो.ना. आत्तार, पो.शि. राजकुमार जाबा या सायबर सेलच्या पथकाने व प्रदिप खळे या सायबर तज्ञ यांनी केली आहे